# गुलाब.....




व्हॅलेंन्टाईन डे च्या आधी, सर्वत्र ७ फेब्रुवारी पासून Rose week सुरू होतो, ते १४ फेब्रुवारी पर्यंत... आणि अमेरिकेत जून महिना हा Rose month म्हणून साजरा केला जातो. कारण या महिन्यात प्रेम आणि सौंदर्य ह्या चे प्रतिक असलेल्या गुलाबाला बहर आलेला असतो. प्रत्येक घरासमोर, बागेत गुलाबाचे ताटवे फुलले असतात. अगदी पहात रहावे असे ते दृष्य असते.

त्या गुलाबावरच्या प्रेमावर हे छोटे मनोगत.....

गुलाब माहीत नसलेली एकही व्यक्ती या पृथ्वीवर नसेल, यावर मी पैज लावायला तयार आहे. त्यांचा मोहक आकार, सुंदर सुगंध, आकर्षित रंग यामुळे कोणी ह्या फुलाला विसरूच शकत नाही.
सर्वांना माहीत असलेला, सर्वांचा आवडता गुलाब.. फुलांचा राजा उगीच नाही झाला...

माझ्या लहानपणी पहिल्यांदी मला दिसला तो चिनी गुलाब... मिनीएचर, छोटंस सुंदर फूल! आणि त्याची इवलीशी पानं! बागेत आणि अनेकांच्या कुंडीत असायचचं! पावसानंतर छोटी फांदी जरी खोचली तरी सहज लागायची आणि लगेच हात पाय पसरत ती कुंडीभर व्हायची आणि छान फुलायची! एका घरातून दुसऱ्या घरात सहज तिचं स्थलांतर व्हायचं. सुंदर रंग असतात चिनी गुलाबाचे..लाल, गुलाबी, केशरी, पिवळा, किरमिजी.....भरपूर ऊन आणि कमी पाणी असलं की मस्त आनंदानी बाग सजवतात.



मग मी या गुलाबाचं चित्र काढायला शिकले. सोपा गुलाब .. तुम्ही पण लहान असतांना असा काढला असाल.. मग जरा त्या रेषांमधे जाडी, गोलावा येत, सुधारणा होत गेली.

नंतर मोठ्या गुलाबाची रंगावरून जास्त ओळख झाली.
लाल, केशरी, पांढरा, पिवळा.... नाही म्हणायला गुलकंद करतात तो गुलाबी, गावठी गुलाब, आणि झुबक्यानी फुलं येणारा वेल गुलाब.. ही दोन वेगळी नांवं असायची.
खरं तर जातीवरून गुलाबांची कितीतरी नांव आहेत.



गुलाब सगळ्यांकडे नसायचा. चिनी गुलाबाइतकं पटकन कोणी कोणाला देत नसे रोप किंवा फांदी.. फुलं सुध्दा सहज देत नसत. इतकं ते फूल स्पेशल असतं ...हे लहानपणीच कळलं! पण लग्नसमारंभात मात्र दारावर किंवा लग्न लागल्यानंतर लाल गुलाबाचे फूल द्यायची पध्दत होती.. म्हणून मला त्या फुलांसाठी, तेव्हा कोणाच्याही लग्नाला जायला आवडायचं. त्याकाळी जवाहरलाल नेहरू, त्यांचा गुलाबाचे फूल लावलेला कुर्ता प्रसिध्द होता म्हणे.. अनेक पुरूषही म्हणून लग्नात आपल्या कोटावर, शर्टाच्या, कुर्त्याच्या बटणात गुलाबाचे फूल लावायचे. पण काही जण खुर्चीवर फूलं ठेऊन उठायचे. मग आम्हा लहान मुलींना, ती फूलं गोळा करून, स्वत:च्या वेणीत घालायला आवडायचे. कधी त्यावरून ओरडाही खायचो.

आमच्याकडे एकदा आईनी, कोणीतरी कटिंग केले होते, त्यातली जाड फांदी आणून लावली होती. रंग कुठला आहे गुलाबाचा, ते मला माहीत नव्हतं. एकदा झाडाला हात लावला आणि नेमका काटा घुसला हातात.. टचकन डोळ्यातून पाणी आलं!

“इतकी छान फुलं येणाऱ्या झाडाला हे काटे कां असतात?” मी चिडून आईला विचारलं होतं .....

“अगं काट्यांमुळे झाडाचं रक्षण होतं. गुरंढोरं जात नाहीत त्यामुळे जवळ, ते खायला.. तुझ्यासारखी लहान मुलं पण जात नाहीत त्याच्या जवळ,एकदा काटा टोचला की !”.....

पटलं मला ! मी परत हात नाही लावला. नंतर आलेलं फूल आईनी अलगद कात्रीनी कापून, पहिलं फूल म्हणून देवाला वाहिलं.

फूल आल्यानंतर आईनी वरची फांदी कात्रीने कापलेली आठवतयं. गुलाबाचे कटिंग नेहमी करायला लागते. कधी फक्त वरचे हलके कटिंग, तर कधी उंच वाढलेल्या जाड फांद्या .. ..मग आडव्या फांद्या वाढू द्यायच्या.. खूप, पण छोटी फुलं येण्यापेक्षा, कमी पण, मोठी फूलं येण्यासाठी असं करायला लागतं.

कधी मुळाजवळच्या खोडाजवळचे २/४ डोळे सोडून, फक्त ७/८ इंच खोड ठेऊन, सर्व वरचं झाड कापायचं! हे मी अमेरिकेत, पुण्यातही पाहिलं. चांगली ५/६ फूट वाढलेली, सशक्त गुलाबाची झाडं ...थंडी, स्नो सुरू व्हायच्या आधी कापतात. चांगलं हाताइतकं मोठं फूल यायचं.... तरी कापलं, म्हणून मी हळहळले होते एकदा... पण त्या झाडाच्या मालकांनीच सांगितलं, आता पुढच्या वेळी आणखी हेल्दी झाड वाढेल आणि फूलही मोठं येईल.
माती पण सैल करायला लागते मधून मधून.. पाणी बेतानी घालायला लागते.. मग जास्त थंडी नसेल, तिथे बारा महिने फुलं येतात गुलाबाला!

मोठे प्राणी गुलाबाच्या वाटेला जात नसले तरी किडे मात्र जातात. झाडं खराब करतात,

कळ्या, पानं खातात, रोगही पडतो झाडावर.. मग काळजी घ्यावी लागते. त्यासाठी औषधं असतात. नीम पानं, खत, मातीत मिसळणे, लसूण मिरचीचे पाणी फवारणे हे सोपे घरगुती उपाय करायला लागतात.

काही रानटी गुलाब असतात. सिंगल पाकळ्याचे, वेलीवर, कुंपणावर, कुठेही उगवतात. मध्ये पिवळे पराग असतात, लाल, गुलबट फुलं नाजूक, छान दिसतात. काश्मिरला असे वेल खूप पाहिले. देठ लहान असल्यामुळे मी ती फुले कानात डूल म्हणून घातल्याचे आठवतेय.

जाड फांदींना जसा गुलाब लागतो, तसा काही जातींत, गुलाब फूल सुकले की खालच्या भागात बिया तयार होतात, काहींना लाल फळं येतात, त्यात सुकल्यावर बिया मिळतात आणि त्या लावूनही रोप तयार केले जाते.

हल्ली गुलाब फारच प्रसिध्द झाल्यामुळे जगभर त्याची मागणी वाढली आहे. आणि गुलाबाची शेती अनेक ठिकाणी केली जात आहे. गुलाबाच्या जवळ जवळ १५० जाती आहेत. पण कलमे, प्रयोग करून, २००० प्रकारचे गुलाब बाजारात उपलब्ध आहेत. हल्लीच ७/८ वर्षांपूर्वी निळा गुलाब शास्त्रज्ञांनी शोधून काढला.. त्या साठी ते १४ वर्ष प्रयत्न करत होते.

युरोप, अमेरिका, ग्रीस इथे गुलाबांचा उल्लेख सापडला .. आशिया मायनर (Anatolia), आणि पश्चिम चीन हे गुलाबांचे मूलस्थान असावे .. यावर अजून एकमत नाही. मानवाच्या आधीचे गुलाबाचे, पानांचे अवशेष, ३ कोटी वर्षांपूर्वीचे एका खडकात सापडले आहेत.

आपल्या पुरातन साहित्यात, लोकसंगीतात कलेत ...गुलाबाचा उल्लेख आढळतो.

१६ व्या शतकात बाबरनी प्रथम भारतात गुलाब आणला.
मुगल राजे गुलाबाचे शौकिन होते. त्यांनी खूप गुलाबाच्या बागा बनवल्या होत्या. जहाँगीर ची पत्नी नूरजहांनी प्रथम गुलाबाचा अर्क काढला. गुलाब जल, अत्तर त्यामुळे भारताला कळलें.

१२ फेब्रुवारी गुलाब दिन भारतात साजरा करतात.

गुलाब हा प्रेमाचे प्रतिक आहे. गुड लक, ऑल द बेस्ट साठी लाल गुलाब पाठवतात. व्हॅलेंनटाईन डे ला, लाल गुलाबच पाठवतात. गुलाबी गुलाब हे आदर, कृतज्ञता, आनंद, प्रोत्साहन ह्याचे प्रतिक आहे. मैत्री साठी फ्रेंडशिप डे साठी पिवळा गुलाब आहे. केशरी गुलाब उत्साह, अति

आवड, छंद यासाठी आणि पांढरा गुलाब निरागसता आणि पवित्रता ह्याचे प्रतिक आहे.

गुलाबाच्या मी प्रेमात पडले आहे. गुलाबाची लालसर, कोवळी पालवी, कळी, हळू हळू उमलणाऱ्या २५ / ३० पाकळ्या, त्याचा पाकळ्याचा गोलाकार,, मागे वळलेल्या पाकळ्या, ताठ पण लांब देठ, कातर पानं हे सर्वच मला इतके आवडते कि मी वेड्यासारखी त्यांचे फोटो काढते. अनेक रोझ गार्डन्स, प्रदर्शनात मी काढलेल्या फोटोंपैकी हे काही गुलाबाचे फोटो.. आणि काही मी काढलेली गुलाबाची चित्रं....




अनेक रूपांत,
मला मोहवलेस तू..
मंद गंधात,
धुंद केलेस तू..
काटे झेलत,
मस्त फुललास तू...
गुलाबा, सतत,
जगणे शिकवलेसं तू..

**.......... चित्रा मेहेंदळे**